# देगलूर महाविद्यालयाच्या दीक्षा जोगे हिचे जलतरण स्पर्धेत यश

**देगलूर/प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड व उत्कर्ष व्हॅकेशन ट्रेनिंग कॉलेज,सगरोळी येथे दि.१० ऑगस्ट रोजी शनिवारी आयोजित आंतर महाविद्यालयीन विद्यापीठीय जलतरण स्पर्धेत देगलूर महाविद्यालयाची दिक्षा दिपक जोगे या खेळाडूने १०० व ५० मीटर फ्रिस्टाईल मध्ये सुवर्ण पदक तसेच १०० मीटर ब्रेदस्टोकमध्ये रौप्य पदक अशा ३ प्रकरात पदक पटकावित देगलूर महविद्यालयासाठी जनरल चॅम्पियनशिप खेचून आणली आहे. तसेच देगलुर महाविद्यालयाची यशस्वी परंपरा कायम ठेवली आहे.या यशाबदल अडत व्यापारी शिक्षण



संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य डॉ. कर्मवीर उनग्रतवार, देवेंद्र मोतेवार, नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार, गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, गोविंदप्रसाद झंवर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर व सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी कौतुक केले आहे.

Scanned with OKEN Scanner